**CNR NO : MJHBU1400116-2021**

नि.दिवाणी दावा क्र. ०७/२०२१

मनोज वि. विश्वनाथ व इतर

## आदेश निशाणी क्र. ५ खाली

दिवाणी प्रकिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ सहकलम १५१ अन्वये तात्पुरत्या मनाई हुकूमाकरीता अर्ज आहे.

२. अर्जदार व गैरअर्जदार यांना यापुढे दाव्यातील त्यांच्या मुळ दर्जाप्रमाणे वादी व प्रतिवादीं असे संबोधण्यात येते. वादीने प्रतिवादींविरुध्द कायमस्वरुपी मनाई हुकूम्याकरिता दावा दाखल केलेला आहे.

३. वादीचे कथन थोडक्यात येणेप्रमाणे -

मौजे लोणी काळे, ता. मेहकर, जि. बुलडाणा येथील शेत गट क्र. १८८ मधील क्षेत्रफळ ०.४० हे.आर., ज्याची चर्तुसिमा पूर्वेस – लक्ष्मीबाई सरदार चे शेत, पश्चिमेस - विश्वनाथ सखाराम नेमाडे (प्रतिवादी क्र. १) चे शेत, उत्तरेस - रस्ता आणि दक्षिणेस - गणेश बळीराम अल्हाटचे शेत आहे. (यापुढे वादशेत असे संबोधण्यांत येते). वादीने दिनांक ०५/०१/२०११ रोजी मौल्यवान भरण्यामध्ये शांताबाई शिवाजी अंभोरे यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखताने वादशेत विकत घेतलेले आहे. वादी वादशेताचा मालक असुन त्यावर त्याचा ताबा आहे. त्याबाबत महसूल अभिलेखामध्ये नोंद झालेली आहे. प्रतिवादींचे वादशेताच्या पश्चिम दिशेला शेत आहे. वादी आणि प्रतिवादीं यांच्यामध्ये पूर्वीपासून वाद आहेत व त्याबाबत फौजदारी प्रकरणे प्रलंबीत आहेत. दिनांक ०८/०१/२०२१ रोजी, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादशेताचा धुरा फोडण्याचा प्रयत्न केला, धुऱ्यावरील लिंबाची झाडे बेकायदेशिर तोडले, वादीच्या भावास मारहाण केली आणि वादीला जिवे मारण्याची धमकी दिली. प्रतिवादी मागील दोन ते तीन महिन्यापासून वादीच्या गैरहजेरीमध्ये वादशेताचे नुकसान करीत आहेत, त्यामध्ये घुसण्याचा प्रयत्न करीत आहेत व वादीच्या वादशेतावरील ताब्याला अडथळा करुन नुकसान करीत आहेत. वादीने त्यासंदर्भात पोलीस स्टेशनमध्ये खबर दिली. पोलीसांनी त्यावरुन अदखलपात्र गुन्हयाची नोंद घेतली व माननीय न्यायालयामध्ये दाद मांगण्याचे सांगितले. वादीच्या बाजुने तात्पुरत्या मनाई हुकूमाचे सर्व घटक स्थापीत आहेत. प्रतिवादींच्या बेकायदेशिर कृत्यास प्रतिबंध घालण्यासाठी तात्पुरत्या मनाई हुकूमाची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे वादींनी विनंती केली. वादीने अर्जाच्या पृष्ठयर्थ खालील कागदपत्रांवर भिस्त ठेवली.

| अ. क्र | दस्तऐवजाचे वर्णन. | यादी निशाणी क्रमांकाखाली दाखल. |
|---|---|---|
| १ | सात बारा उतारा, | निशाणी क्र. ४ खाली |

| | | |
|---|---|---|
| २ | खरेदीखत दिनांक ०५/०१/२०११ ची प्रत, | निशाणी क्र. १९ खाली |
| ३ | खरेदीखत दिनांक १५/०४/२०१० ची प्रत, | |
| ४ | अदखलपात्र गुन्ह्याची पहिली खबरची प्रत | |
| ५ | फेरफार नोंदवहीची प्रत | |
| ६ | मा. उच्च न्यायालय यांनी अटकपूर्व जामीनाबाबत पारित केलेल्या आदेशाची प्रत | |

४. प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी लेखी-जबाब वजा म्हणणे (निशाणी क्र. १५) यांप्रमाणे त्यांच्याविरुध्दचे संपूर्ण कथन नाकारले. त्यांनी वादीची वादशेतावरील मालकी आणि त्याचा त्यावरील ताबा माहितीअभावी आणि इतर घटना व अडथळा याबाबतचा मजकूर खोटा असल्याचे नमुद करुन नाकारले. वादशेताच्या पश्चिमेकडे प्रतिवादी क्र. १ ची शेती असल्याबाबत त्यांनी कबूल केले. त्यांनी कथनामध्ये पुढे नमुद केले की, वादीच्या बाजुने तात्पुरत्या मनाई हुकूमाचे घटक स्थापित होत नाहीत. वादी व प्रतिवादीं यांच्या शेतामध्ये धुरा आहे. प्रतिवादींनी त्यावर त्यांच्या बाजुने लावलेली लिंबाची झाडे आहेत. वादी व प्रतिवादीं यांच्यामध्ये वर्ष २०१२ पासून, सदर धुऱ्यासंबंधी वाद आहेत. वादीने ट्रॅक्टरद्वारे बेकायदेशिरपणे सदर धुरा फोडला आणि लिंबाचे झाड तोडले. वादी आणि त्याच्या कुटुंबियांनी प्रतिवादी क्र. ५ ला मारहाण केल्यामुळे त्यांच्याविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ च्या गुन्ह्याकरिता न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मेहकर येथे नियमित फौजदारी प्रकरण क्र. १६८/२०१२ प्रलंबीत आहे. वादी व त्याचे भाऊ यांनी दिनांक १८/०५/२०२० रोजी प्रतिवादीं सोबत भांडण केले, वादीने धुरा व दगडाची पोळ फोडले, प्रतिवादी क्र. ५ ला जिवघेणी मारहाण आणि शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वादीने म्हटले की, "शेत आम्हास विकुन टाक, आम्हाला मांग शेजारी पाहिजे नाही". त्यानंतर, वादी व त्याचे भाऊ यांनी प्रतिवादीं सोबत वाद केला आणि शेतात जातानां रस्त्यात अडविले, मारहाण व शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. त्याबाबत पोलीस स्टेशन, जानेफळ येथे गुन्हा दाखल झाला व न्यायालयामध्ये प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. प्रतिवादींनी वादींच्या गैरकृत्याबाबत माननीय जिल्हा पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांच्याकडे तक्रार दाखल केलेली आहे. दिनांक २१/०७/२०२० रोजी, वादी व त्याचे भाऊ यांनी प्रतिवादी क्र. १ ला कुऱ्हाड आणि लोखंडी रॉडने जबर मारहाण केली, शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. त्याबाबत पोलीस स्टेशन, जानेफळ येथे भारतीय दंड विधानाचे कलम ३०७, ३२४ व ५०४ सह कलम ३४ करिता गुन्हा क्र. २४९/२०२० दाखल झाला. माननीय सत्र न्यायालय, मेहकर यांनी वादीचा जामीन अर्ज फेटाळला. वादी गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहे व त्याच्याविरुध्द अनेक प्रकरणे दाखल आहेत. वादी अनिष्ट हेतुने प्रतिवादींना त्रास देतो व जमीन विकण्यास अप्रत्यक्ष प्रवृत्त करीत आहे. प्रतिवादी क्र. ३, ४ व ६ यांचे वादशेतालगत शेत नाही. वादीने त्यांना दाव्यामध्ये निष्कारण पक्ष केलेले आहे. त्यामुळे, अर्ज नुकसान भरपाई खर्च रुपये १,००,०००/- सह खारीज करण्याची विनंती केली.

प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ खालील कागदपत्रांवर भिस्त ठेवली.

| अ. क्र | दस्तऐवजाचे वर्णन. | यादी निशाणी क्रमांकाखाली दाखल. |
|---|---|---|
| १. | पोलीस स्टेशन, जानेफळ यांना दिलेला तक्रार अर्ज दिनांक १८/०५/२०२० ची प्रत. | निशाणी क्र. १७ |
| २. | मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांना दिनांक २२/०६/२०२० रोजी दिलेल्या अर्जाची स्थळप्रत. | |
| ३. | गुन्हा क्र. २०३/२०२० ची पहिली खबर. | |
| ४. | गुन्हा क्र. २४९/२०२० ची पहिली खबर. | |

५.        मी उपलब्ध अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले व त्यानुसार माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात व मी त्यावर माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण आहे काय ? | ...... होय. |
| २ | वादीच्या बाजुने संतुलनाचा तुळ प्रस्थापित होतो काय ? | ......होय. |
| ३ | तात्पुरता मनाई हुकूम नाकारल्यास वादीला अपरिमीत नुकसान होते काय ? | ......होय. |
| ४ | आदेश काय ? | ...... अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>कारणमिमांसा</u>

<u>विचारार्थ मुद्दा क्र. १ ते ३ करिता -</u>

६.        उपरोक्त मुद्दे एकमेकांशी सबंधीत असल्याने त्यांना एकाचवेळी चर्चेकरीता घेतले आहे. वादीने तात्पुरत्या मनाई हुकूमाचे घटक प्रथमदर्शनी सिध्द करणे आवश्यक आहे.

७.        वादींकरिता विद्वान अधिवक्ता श्री. ओ.जी.राठी यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादींनी वादशेताचे अस्तित्व व वर्णन कबूल केले व अप्रत्यक्षरित्या त्यावरील मालकी आणि त्याचा ताबा कबूल केले. त्यासंबंधी खरेदीखत पुरेसा पुरावा आहे. प्रतिवादी व वादी यांच्यामध्ये पुर्वी पासून वाद असल्याने ते वादशेतामध्ये पश्चिम बाजुने अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. नमूद घटनांप्रमाणे प्रतिवादींनी वादीच्या ताब्याला अडथळा केला. प्रतिवादींच्या कथनामध्ये सुध्दा त्या अनुषंगाने नमुद आहे. माननीय उच्च न्यायालयाने उल्लेखीत गुन्ह्यामध्ये वादी व इतरांना अटकपूर्व जामिन मंजूर केलेला आहे. वादीच्या बाजुने तात्पुरत्या हुकूमाचे महत्वाचे घटक स्थापित होतात. त्यांनी अर्ज मंजूर करण्यांबाबत विनंती केली.

८.        प्रतिवादींकरिता विद्वान अधिवक्ता श्री.सी.वाय.जाधव यांनी युक्तीवाद केला की, वादीने प्रतिवादींविरुध्द खोटे आरोप केलेत व स्वतः धुऱ्यावरील दगडाची पोळ आणि लिंबाचे

झाड ट्रॅक्टरद्वारे तोडले. उल्लेखीत भिती निश्चित नाही. प्रतिवादींनी वादीच्या ताब्याला अडथळा केलेला नाही. वादीने प्रतिवादींना नुकसान करण्याच्या हेतुने अर्ज दाखल केला. वादीच्या बाजुने तात्पुरत्या मनाई हुकुमाचे घटक स्थापित होत नाहीत. त्यांनी अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

९. मी अभिलेख व युक्तीवाद यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. त्याप्रमाणे वादी आणि प्रतिवादी क्र. १ चे शेत लगत आहे. प्रतिवादींनी वादशेताची मालकी व ताबा याबाबत वादीच्या कथनाशी विसंगत कथन केलेले नाही किंवा इतर कोणाची त्यावर मालकी दर्शविलेली नाही. यथास्थितीत, प्रतिवादींनी सदर बाबी माहीतीअभावी नाकारणे हे वादीच्या कथनावर विसंगत परिणाम करीत नाही. तसेच वादशेताचे पूर्वीचे मालक सुभद्रा आनंदा पैठणे, भिमा आनंदा पैठणे व बेबी डिगांबर बोरकर यांनी शांताबाई शिवाजी अंभोरे आणि त्यानंतर, शांताबाई शिवाजी अंभोरे यांनी वादी यांना वादशेत नोंदणीकृत खरेदीखतांनी हस्तांतरीत केलेले आहे. सदर खरेदीखत हे वादींची वादशेतावरील प्रथमदर्शनी मालकी व हक्क स्थापित करते. त्याप्रमाणे, वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण आहे. प्रतिवादींनी वादींचा वादशेतावरील ताबा अप्रत्यक्षरित्या कबूल केलेला आहे.

१०. वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये वादशेताच्या पश्चिमेकडील धुऱ्याबाबत वाद आहेत आणि त्यांच्यामध्ये वेळोवेळी मारहाण व इतर अशा अनेक घटना घडल्याची शक्यता दिसून येते. त्याबाबत प्रलंबीत फौजदारी प्रकरणांबाबत दोन्ही पक्षांनी वाद केलेले नाहीत. दोन्ही पक्षांच्या कथनाप्रमाणे उल्लेखीत धुऱ्यावरील लिंबाच्या झाडाची विल्हेवाट लावल्यामुळे वाद झालेत. यथास्थितीत, वादी आणि प्रतिवादीं यांच्यामध्ये शेताच्या धुऱ्यावरुन वाद आहेत. परंतु, सदर वाद किंवा फौजदारी प्रकरणे यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल केला हे स्विकारणे उचित होणार नाही. याउलट, सदर बाबी प्रस्तुत दावा आणि अर्ज दाखल करण्याचे कारण घडल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करतात. सदरची बाब व प्रतीवादींच्या कथनामध्ये सुध्दा नमुद आहे. दोन्ही पक्षांनी अभिलेखावर दाखल केलेल्या खबर, अर्ज आणि पहिली खबर हे उल्लेखीत अडथळ्याला बळकटी प्रदान करते. यथास्थितीत, वादीच्या वादशेताच्या ताब्याला प्रतिवादीकडून अडथळा होत असल्याची निश्चित भिती वजा शक्यता आहे. वादीला उल्लेखित गुन्हयामध्ये जामिन नाकारणे किंवा मंजूर होणे हे याप्रकरणाशी असबंधीत बाब आहे, त्यामुळे त्याबाबत येथे चर्चा करणे हे वादमुददयाशी विसंगत होईल.

११. वादीने सर्व प्रतिवादींविरुध्द आरोप केलेले आहेत आणि त्याअनुषंगाने मागणी केलेली आहे. प्रतिवादींनी त्यांच्यातील नातेसंबंध किंवा जोडजमाव नाकारलेला नाही. याक्षणी, दावा किंवा अर्ज दाखल करण्याचे कारण ठरविण्याकरिता दाव्यातील मजकूर महत्वाचा आहे. त्याप्रमाणे, प्रथमदर्शनी सर्व प्रतिवादींचा अडथळयामधील सहभाग व त्यासबंधी शक्यता निष्पन्न होते. त्यामुळे, याक्षणी प्रतिवादी क्र. ३, ४ व ६ यांना दाव्यामध्ये अनावश्यक किंवा निष्कारण पक्ष

केल्याचे ठरविता येणार नाही. सदरची बाब ही दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी निकाली काढता येवु शकते. त्यामुळे, उल्लेखीत हरकत ही याक्षणी स्विकारण्याजोगी नाही. उपरोक्त चर्चेप्रमाणे वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण असून संतुलनाचा तुळ सुध्दा स्थापित झाला.

१२.        वादीला वादशेताचा उपभोग घेण्याचा कायदेशिर अधिकार आहे. प्रतिवादींना कायदेशिर बाबींचा अवलंब न करता वादीला त्यापासून प्रतिबंध करण्याचा अधिकार नाही. याक्षणी तात्पुरता मनाई हुकूम नाकारल्यास वादीच्या ताब्याला नुकसान होवू शकते व त्याव्दारे वादीचे अपरिमीत नुकसानाची निश्चित शक्यता दिसून येते. याउलट तात्पुरता मनाई हुकूम मंजुर केल्यास प्रतीवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. एकंदरीत तात्पुरत्या मनाई हुकूमाचे महत्वाचे घटक जसे- प्रथमदर्शनी प्रकरण, संतुलनाचा तुळ आणि अपरिमीत नुकसान वादीच्या बाजुने स्थापित झालेत.

१३.        वरील विवेचनेवरुन वादीचा वादशेतावर मालकीहक्क् व ताबा आहे. प्रतीवादींनी वादीच्या ताब्याला अडथळा केलेला आहे. त्यांनी विहीत कायदेशिर प्रक्रीयेचा अवलंब केलेला नाही. त्यांना बळजबरीने वादीच्या शेतामध्ये अतीक्रमण करता येणार नाही. वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण असून संतुलनाचा तुळ सुध्दा स्थापित झाला. यथास्थितीत, वादीचा वादशेतावरील ताबा प्रतिवादींच्या अडथळ्यापासून संरक्षित करणे आवश्यक आहे. त्यामुळे, वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्यास प्रतिबंध होवू शकतो. वादीला तात्पुरता मनाई हुकूम नाकारण्याचे कोणतेही सबळ कारण उपलब्ध नाही. यथास्थितीत, वादीचा वादशेतावरील ताबा संरक्षित करण्याकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तात्पुरता मनाई हुकुम देता येईल. वादी त्याकरीता पात्र आहे. सबब, विचारार्थ मुद्दा क्र. १ ते ३ यांना होकारार्थी उत्तर दिले.

<u>विचारार्थ प्रश्न क्र. ४ करिता -</u>

१४.        उपरोक्त चर्चा आणि विश्लेषण यावरुन वादींच्या बाजुने तात्पुरत्या मनाई हुकुमाचे घटक व आवश्यकता स्थापित झालेली आहे. वादीला दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश देता येईल व त्याप्रमाणे वादीने दर्शविलेली भिती संरक्षित करता येईल. करीता अर्ज मंजूर करणे उचित होईल. प्रस्तुत अर्जाचा खर्च हा दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी सुध्दा विचारात घेता येतो. त्यामुळे, याक्षणी अर्जाचा खर्च ठरविणे योग्य होणार नाही. सबब, विचारार्थ प्रश्न क्र. ४ च्या उत्तरामध्ये मी खालील आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१) अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजुर करण्यांत येतो आणि दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ प्रमाणे वादीच्या बाजुने तात्पुरता मनाई हुकूम मंजूर करण्यांत येतो की प्रतिवादी क्रमांक १ ते ६ किंवा त्यांच्या वतीने इतर कोणीही दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो

वादीच्या वादशेतावरील ताब्याला अडथळा करु नये.

२)  खर्चाबाबत आदेश नाही.

३)  आदेश संगणकावर टंकलिखीत करुन खुल्या न्यायालयामध्ये घोषित केला.

स्वा/-

दिनांक ०९/०८/२०२१.

( श. अ. सुरजुसे )

सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर

मेहकर